# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 16 April 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १६ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग
- उस्मानाबाद मतदार संघातून तीन तर लातूर मतदार संघातून पाच उमेदवारी अर्ज दाखल
- नागरी सेवा परीक्षांचा अंतिम निकाल जाहीर;परभणी तसंच हिंगोलीच्या तरुणांची चमकदार कामगिरी

आणि

- परभणी लोकसभा मतदार संघात टपाली मतदानाला सुरुवात

****

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला आता वेग आला आहे. या टप्प्यात अर्ज भरण्याची मुदत येत्या शुक्रवारी १९ तारखेला संपत आहे. या टप्प्यात आज उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी मंत्री आणि युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, माजी मंत्री अमित देशमुख, आमदार रोहित पवार उपस्थित होते. या निमित्तानं धाराशिव शहरातल्या प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत महाविकास आघाडीचे समर्थक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. अपक्ष उमेदवार मनोहर आनंद पाटील यांच्यासह आज एकूण तीन जणांनी उस्मानाबाद लोकसभा मतदार संघासाठी अर्ज दाखल केले. लातूर मतदार संघातून आज महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांच्यासह पाच जणांनी नामनिर्देशन पत्र दाखल केल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार शाहू महाराज छत्रपती यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाविकास आघाडीकडून जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात आलं. कोल्हापूर जिल्ह्यातल्या हातकणंगले मतदारसंघासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सत्यजित पाटील सरुडकर यांना आज उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे अन्य नेते आणि कार्यकर्ते याचेळी उपस्थित होते.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या माढा लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांचा उमेदवारी अर्ज विजयसिंह मोहिते पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांच्याकडे आज दाखल केला. यावेळी माजी आमदार नारायण पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाबासाहेब देशमुख, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे उपस्थित होते.

सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार अनुक्रमे राम सातपुते आणि रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी देखील आज अर्ज भरले. त्यानंतर महायुतीनं रॅली काढून शक्तिप्रदर्शन केलं.

काँग्रेस पक्षाच्या माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज आज दाखल केला. फाटलेली साडी नेसून उमेदवारी अर्ज दाखल करायला आल्यामुळे फुलारे यांनी माध्यमांचं लक्ष वेधून घेतलं होतं. सोलापूरच्या विकासाची अवस्था दाखवण्यासाठी अशा पद्धतीनं अर्ज भरायला आल्याचं त्यांनी माध्यमांना सांगितलं.

****

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी इंडिया आघाडीकडून अर्ज सादर केला. यावेळी इंडिया आघाडीचे नेते उपस्थित होते. यावेळी राऊत यांनी एका रॅलीद्वारे शक्तिप्रदर्शन केलं. दरम्यान, अमृत अनंत तांबडे यांनीही या मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज सादर केला.

****

सातारा लोकसभेच्या जागेसाठी भाजपकडून उदयनराजे भोसले यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्यानंतर आता या मतदारसंघात महायुतीचे उदयनराजे विरुद्ध महाविकास आघाडीचे शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे यांच्यात मुख्य लढत होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

****

येत्या एकोणीस तारखेला मतदान होणार असलेल्या गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथकं रवाना करण्यास आज सुरूवात करण्यात आली. अशा ६८ मतदान केंद्रांवरच्या २९५ मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर सामग्रीसह भारतीय वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहचवण्यात आलं.

****

अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणी दोन आरोपींना न्यायालयानं १० दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. विक्की गुप्ता आणि सागर पाल अशी या दोघांची नावं असून, त्यांना काल गुजरामधून अटक करण्यात आली. या दोघांनी रविवारी सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्याचा आरोप आहे.

****

केंद्रीय लोकसेवा आयोगानं सप्टेंबर २०२३ मध्ये घेतलेल्या नागरी सेवा परीक्षांचा अंतिम निकाल आज जाहीर केला. आयोगानं भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परराष्ट्र सेवा, भारतीय पोलीस सेवा आणि केंद्रीय सेवा, गट `अ` आणि गट `ब` च्या नियुक्तींसाठी साठी एकूण एक हजार सोळा उमेदवारांची शिफारस केली आहे. त्यात ३५२ मुलींचा समावेश आहे. या परीक्षेमध्ये आदित्य श्रीवास्तव यांचा प्रथम क्रमांक आला आहे. ते भारतीय तंत्रज्ञान संस्था आय आय टी कानपूरचे विद्युत अभियांत्रिकी पदवीधर आहेत. अनिमेष प्रधान दुसऱ्या तर दोनुरु अनन्या रेड्डी

तिसऱ्या क्रमांकावर आहेत. या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या पहिल्या पंचवीस उमेदवारांमध्ये दहा महिला आहेत. या परीक्षेला ६ लाखापेक्षा जास्त उमेदवार बसले होते.

हिंगोली जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यातल्या शिवनी इथले डॉ. अंकेत केशवराव जाधव यांनी पहिल्याच प्रयत्नात केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करत तीनशे पंचाण्णवावा क्रमांक मिळवला आहे. अंकेत जाधव यांचं शालेय शिक्षण कळमनुरीमध्ये, उच्च माध्यमिक शिक्षण नांदेड इथं तर वैद्यकीय शिक्षण पुणे इथं झालं आहे.

परभणीचे नीलेश डाके यांनीही या परीक्षेत यश मिळवलं आहे. त्यांचा नऊशे अठरावा क्रमांक आला असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भगवान श्रीरामांचा जन्मोत्सव रामनवमी उद्या साजरी होत असून, शिर्डी इथं रामनवमी उत्सवाला आज सुरूवात झाली. पहाटेच्या काकड आरतीनंतर साई प्रतिमा, वीणा आणि पोथीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात सहभागी होण्यासाठी शेकडो पायी पालख्या शिर्डीत दाखल झाल्या आहेत.

दरम्यान, शिर्डीला येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी शिर्डी साईनगर रेल्वेस्थानकावर श्री साईबाबा संस्थानाच्या माहिती आणि सुविधा केंद्राचं तसंच प्रसादाच्या लाडूंच्या विक्री केंद्राचं आज उद्घाटन करण्यात आलं.

****

रामनवमीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं आज पोलिस प्रशासनाच्या वतीनं शांतता समितीची बैठक घेण्यात आली. सर्व जातीधर्माचे प्रतिनिधी या बैठकीत सहभागी झाले. नागरिकांनी शांततेत सर्व सण साजरे करण्याचं आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आलं.

****

परभणी लोकसभा निवडणुकीच्या पोस्टल मतदानाला आजपासून सुरुवात झाली. आज परभणी, पाथ्री आणि जिंतूर विधानसभा मतदार संघातल्या निवडणूक कार्यात कर्तव्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मतदान केलं, तर उद्या गंगाखेड विधानसभा संघातलं मतदान गंगाखेड इथे होणार आहे. अत्यावश्यक सेवेवर असल्यानं मतदानाला उपस्थित न राहू शकणाऱ्या बावीस हजार पाचशे

पंचाहत्तर मतदारांचं मतदान टपालानं होणार असल्याचं जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, परभणी लोकसभा मतदार संघातल्या दिव्यांग आणि ज्येष्ठ श्रेणीतल्या एक हजार सहाशे एकोणतीस मतदारांकडून त्यांच्या घरी जाऊन मतदान करून घेणार असल्याची माहिती गावडे यांनी दिली.

****

शिक्षणक्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या लातूर पॅटर्नच्या धर्तीवर लोकसभा निवडणुकीतही जास्तीत जास्त मतदानाचा लातूर पॅटर्न निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचं लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितलं आहे. मतदानाचं प्रमाण वाढवण्याच्या हेतूनं स्वीप कक्षाच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी त्या बोलत होत्या. या संघटनांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आपलं योगदान द्यावं, असं आवाहनही त्यांनी केलं. या आवाहनाला प्रतिसाद देत, मतदानासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या लातूरकरांना प्रवासी भाड्यात दहा टक्के सवलत देण्याची घोषणा लातूर जिल्हा ट्रॅव्हल असोसिएशननं केली, तर, मतदान करणाऱ्या नागरिकांना बिलामध्ये दहा टक्के सवलत देण्याची घोषणा लातूर पॅथालॉजी असोसिएशननं केली.

****

समता पंधरवड्याच्या औचित्यानं बीड जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेच्या इयत्ता अकरावी आणि बारावीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही मोहीम आहे. पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेत जात पडताळणी समितीकडे अर्ज करावेत, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****